International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# ‘फेसाटी’ कादंबरीतील समाजजीवन

**डॉ. अनुसया राजाराम इमडे**

*दहिवडी कॉलेज दहिवडी*

*Corresponding Author – डॉ. अनुसया राजाराम इमडे*

**DOI - 10.5281/zenodo.18654248**

**प्रस्तावना:**

मराठी साहित्यात १९६० नंतर वेगवेगळे प्रवाह उदयास आले.त्यामध्ये ग्रामीण साहित्य,दलित साहित्य, आदिवासी साहित्य,स्त्रीवादी साहित्य,विज्ञान साहित्य असे साहित्याचे विविध प्रवाह दिसून येतात.ग्रामीण साहित्यात कथा,कादंबऱ्या,कविता असे प्रकारे येतात. ग्रामीण साहित्यातून खेड्यातील जीवन जगत असताना येणाऱ्या समस्या,त्या समस्या सोडवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष,ग्रामीण संस्कृती यांची प्रभावीपणे मांडणी केली जाते.या साहित्यातून ग्रामीण लोकांच्या रूढी परंपरा,त्यांच्या बोलीभाषा, सुखदुःख, व्यथा वेदना, श्रद्धा-अंधश्रद्धा, शेती, दुष्काळ, कर्जबाजारीपणा, भावभावकीतील कलह अशा गोष्टींचे वास्तव चित्रण केले आहे. ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत पोहोचल्यानंतर खेड्यातील तरुण शिकू लागले,साक्षर झाले आणि आपल्या जीवनातील सुखदुःख,व्यथावेदना शब्दबद्ध करू लागले. त्यातून अनेक ग्रामीण लेखकांचा उदय झाला.ग.ल.ठोकळ, शंकरराव खरात, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, रा.र.बोराडे, सदानंद देशमुख या प्रतिभा संपन्न लेखकांचा उल्लेख करता येईल. गावगुंड, झोपडपट्टी,टारफुला, बनगरवाडी, वावटळ, पुढचं पाऊल, गोतावळा, नटरंग, झोंबी, पाचोळा, चारापाणी, गोतावळा या साहित्यकृतींची निर्मिती झाली.या प्रतिभासंपन्न लेखकांच्या मध्ये भर घालणारे अलीकडचे लेखक नवनाथ गोरे आहेत. त्यांनी ‘फेसाटी’ कादंबरी लिहून मराठी भाषेचे दालन समृद्ध केले आहे.

**‘फेसाटी’ कादंबरी:**

नवनाथ गोरे यांची**‘फेसाटी’** ही पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीची पहिली आवृत्ती २५ ऑगस्ट २०१७ रोजी प्रकाशित झाली. त्यानंतर १२ मार्च २०१९ पर्यंत म्हणजे जवळजवळ दोन वर्षांच्या आतच या कादंबरीची पाचवी आवृत्ती प्रकाशित झाली. या कादंबरीस अनेक नामांकित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सन २०१८ चा युवा साहित्य अकादमी पुरस्कार या कादंबरीस प्राप्त झाला आहे.मनोरमा साहित्य पुरस्कार सोलापूर,बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार वर्धा,भि.ग. रोहमारे साहित्य पुरस्कार कोपरगाव,अस्मितादर्श साहित्य पुरस्कार औरंगाबाद,पद्मगंधा साहित्य पुरस्कार नागपूर इत्यादी पुरस्कारांनी ही साहित्यकृती सन्मानित केली आहे.संत बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या एम.ए.भाग दोनच्या अभ्यासक्रमात फेसाटी कादंबरीचा समावेश झाला आहे.कादंबरीच्या ‘फेसाटी’ या शीर्षकाचा विचार करता काटेरी बाभळीच्या फांद्या तोडून एकत्र ठेवलेल्या ढिगाला सांगली जिल्ह्यात फेस म्हणतात. या शब्दावरून फेसाटी हा शब्द दिला असावा कारण या कादंबरीत चित्रित झालेले शेतकऱ्यांचे जीवन हे बाभळीच्या काट्याप्रमाणे ओरबडणारे आहे. दुसरा अर्थ असाही होऊ

शकतो शेतकऱ्यांच्या शेतात बैल औतकाम करत असताना त्याच्या तोंडाला फेस येतो तसेच आयुष्यभर कष्ट करून जीवनातील संकटाशी सामना करीत असताना या खेड्यातील लोकांच्याही तोंडाला फेस येतो. यावरूनही फेसाटी हे शीर्षक कादंबरीस दिले असावे.

**फेसाटी कादंबरीतील समाजजीवन:**

साहित्य आणि समाज यांचा घनिष्ठ संबंध आहे. समाजात जे जे घडते तेच साहित्यातून चित्रित होत असते.साहित्य हा समाजाचा आरसा आहे.प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा घटक असते त्यामुळे व्यक्तीने जे भोगले,सोसले,अनुभवले तेच साहित्यातून व्यक्त होत असते.फेसाटी कादंबरीतही ग्रामीण भागातील धनगर, पशुपालक,शेतकरी समाजाचे भीषण वास्तव मांडलेले आहे.समाजातील दारिद्र्य,भावभावकीतील तेढ, बेरोजगारी,भ्रष्ट नोकरशाहीव्यवस्था,मूलभूत गरजा भागवण्यासाठी करावी लागणारी धडपड आणि जीवनमरणाचा संघर्ष यांचे वास्तव चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

**१.मूलभूत गरजांसाठी संघर्ष:**

कादंबरीचा नायक नाथा हा सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी या छोट्याशा खेड्यातील आहे. नायकाच्या बालपणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतचा प्रवास या कादंबरीत रेखाटला आहे.आई वडील,सहा बहिणी,दोघे भाऊ असे शेतकरी व पशुपालक कुटुंब आहे.अशा कुटुंबात नायकाची जडणघडण झाली आहे.अशा शेतकरी,पशुपालक समाजाच्या वाट्याला आलेल्या संघर्षमय जीवनाची कहाणी फेसाटी कादंबरीत चित्रित झाली आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच अर्पण पत्रिकेत लेखक सांगतात की,

"अस्मानी संकटाशी दोन हात करता करता……
ज्यांची उभी हयात मातीमोल झाली.
शिक्षणाची गंगा ज्यांच्या दारात आली,
पण परिस्थितीनं ज्यांच्या घशास कोरड पडली
आणि या साऱ्याच कचाट्यात ज्यांच्या जल्माची
फेसाटी झाली त्या माझ्या वर्तमान पिढीस…."

यावरून शेतकरी पशुपालक भटकंती करणाऱ्या समाजाचे दुःख,दारिद्र्य याचे विदारक चित्रण या कादंबरीत दिसून येते.

शेतकऱ्यांचे जगणे म्हणजे संघर्ष.संसाराचा गाडा चालवणे खूप अवघड असते.दोन वेळचे पोट भरण्याचीही सोय नसते.त्यातच मुलाबाळांचा सांभाळ करणे,त्यांचे शिक्षण करणे,मुलींची लग्न करणे,मुलांचा दवाखाना, डोक्यावर कर्जाचा डोंगर,सावकाराचा कर्जासाठी तगादा या जबाबदाऱ्या पार पाडताना नायकाच्या आई बापाच्या फेसाटी होते.

शेतकरी,पशुपालक कुटुंबातील लोकांना अन्न,वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाही नीट भागवता येत नाहीत. नायकाचे आई-वडील रात्रंदिवस कष्ट करत असतात.दुसऱ्याच्या शेतात राबत असतात तरीही त्यांना दोन वेळचे जेवण सुद्धा पोटभर मिळत नाही.दोन-दोन,तीन-तीन दिवस उपाशीपोटी राहावे लागते. घरातील लहान मुलांनाही चतकोर,अर्धी भाकरी खाऊन दिवस काढावा लागतो.लहान भावाला भूक लागेल म्हणून नाथाच्या बहिणीला स्वतःला उपाशी राहावे लागते.कधी कधी बी-बियाणासाठी ठेवलेले धान्य काढून त्याच्या कण्या करून खाव्या लागतात.लेखकाने त्याच्या जीवनातील एक प्रसंग सांगितला आहे.

"जिथं माणसं केळ खात बसली हुती. तथं गेलू. ती माणसं झोपली हुती.कोण बगतया का हळूच नजर फिरवलीन तथं टाकल्याली केळाच्या साली घेटल्या. थोडी

माती लागली हुती.हातानं पुसलीन गबागबा सताठ साली खाल्या.चावीवर जावून वंझळीन पाच सहा वंझळी पाणी प्यालू. जरा प्वाट भरल्यावानी झालं." (पान नंबर १०५)

लेखकाच्या जीवनातील भुकेचे असे अनेक प्रसंग कादंबरीत चित्रित झालेले आहेत.यावरून दारिद्र्याचे भयाण वास्तव वाचकांच्या समोर येते. लेखकाची आई म्हणजे काकू तिला कधी कधी शेजाऱ्यांच्याकडून उसने-पासने पीठ मीठही मिळायचे नाही. ती भूक लागू नये म्हणून पोटाला कपडा बांधून दिवस रात्र काम करत असे. कुटुंबातील सगळया व्यक्ती राबत.दुसऱ्याची मोलमजुरी करत तरीही घरात कधीही सण साजरा करता येत नाही की सणासुदीला गोडधोड खायला मिळत नाही. कपड्याच्या बाबतीत तरी खूपच बिकट अवस्था असते.अंगावरचे वस्त्र फाटल्याशिवाय दुसरे वस्त्र मिळत नाही.लेखक शाळेत जात असतानाही अंगावर फाटकी कपडे घालूनच जावे लागते. लेखकाच्या वडिलांना सुद्धा फाटकी कपडे वापरावी लागतात. निवाऱ्याच्या बाबतीत विचार करता या शेतकरी कुटुंबाला राहण्यासाठी धड घर सुद्धा नाही.कादंबरीत लेखक लिहितात,

"अधनं मधनं पाऊस पडायचा. पडल्याला पावसाचा थेंब सरळ छेपरातनं भुईवर पडत हुता.छेप्पार सगळं वलचिंब हुनं जायाचं.दिसभर, रातभर थंडीच थंडी.अंग नुसतं काकडून जायाचं". (पान नंबर ३१)

अशाप्रकारे या समाजाला रात्रंदिवस काबाडकष्ट करूनही यांच्या साध्या मूलभूत गरजाही भागवता येत नाहीत. आरोग्य आणि शिक्षण याविषयी तर या समाजात उदासीनताच असते.मुलींना तर शिक्षणाची संधीच दिली जात नाही आणि जर दिली तर चार-पाच इयत्ता शिकवून त्यांचे शिक्षण बंद केले जाते.लहान लहान मुलींना आपल्या आई-वडिलांच्या बरोबर दुसऱ्यांच्या शेतात राबवे लागते. लेखकाच्या बहिणीला माहेरून सोने आणले नाही म्हणून विहिरीत ढकलून जीव घेतला जातो. यावरून आजही या समाजात अज्ञान,अंधकार, दारिद्र्य, कष्ट,अन्याय.अत्याचार दिसून येतो.

**२. समाजातील अंधश्रद्धा,रूढी परंपरा यांचे चित्रण:**

प्रत्येक समाजात काही रूढी परंपरा असतात तशाच या समाजातही रूढी परंपरा पाळल्या जातात. हा समाज निरिक्षर, अज्ञानी असल्यामुळे रुढीपरंपरांचा पगडा जास्तच असतो.शेतात पीक चांगलं आल्यानंतर गावातील मरगुबाई देवीला नैवेद्य देणे तसेच गावातील मलकरसिद्ध देवाच्या पुजाऱ्याला धान्य देणे या प्रथा पाळल्या जातात. लेखकाने चांगली शाळा शिकावी, व्यवस्थित कामधंदा करावा यासाठी मायाक्का देवीच्या दुधाचा कार्यक्रम करते असा त्यांची आई नवस करते.लेखक कादंबरीत लिहितात,

"अन् येकदम कुडातनं लालभडक पाणी अंगावर पडलं.......कुंकवाचं पाणी हुतं......घराच्या माग गेलू. बघटल तर काय! पाच लिंबू,पाच बिंब,पाच सूया,दोन कणकीच्या बाहुल्या, बाहुलीच्या डोसक्यात पोटात अन् गळयात सुया टोचल्या हुत्या. नारळाची शिंडी काढल्याली हुती.पिवळया कापडावर ठिवलं हुतं.तसचं सगळं गोळा करून घेतलं रानात निवून जाळलं." (पान नंबर १६६)

यावरून या समाजात अंधश्रद्धा दिसून येते. करणी-बाधा यावर विश्वास असल्याचेही दिसून येते.

लेखक कादंबरीत सांगतात,

"कुणी कायबी सांगायची, वगळीतला मसोबा लागलाई. कोंबडा कापा! दहा वर्षे झाली.देवाचं दुध घाटलं नाय.दुध घाला.म्हणून मायबाय खवळल्या.तिला शांत करा.कोण सांगायचं, म्हाता म्हातारीला बोकाडं

कापा.शिवच्या मरगुबाईला तीन वरसं झाली बोकाड कापलं नाय. म्हणून मरगुबाई खवळल्या.तिला मागून घ्या.आकाडात बोकाडं कापा.बरं हुईल." (पान नंबर १६६)

या प्रसंगावरूनही या समाजाचा अंधश्रद्धाळूपणा आणि देवभोळेपणा दिसून येतो.

**३.समाजातील व्यसनाधीनता आणि कर्जबाजारीपणा:**

ग्रामीण भागातील शेतकरी,पशुपालक समाज शिक्षणापासून वंचित असतो.शिक्षणाचा अभाव असल्यामुळे हे लोक अज्ञानी,निरक्षर राहतात त्यामुळे या लोकांना व्यसनाचे दुष्परिणामही कळत नाहीत.कधी कधी दुःखाचे कढ पचवण्यासाठी दारू पिणे,तंबाखू खाणे या गोष्टी केल्या जातात. समाजातील काही तरुण घरच्या हलाखीच्या परिस्थितीतही शिक्षण घेतात.आई वडीलही काबाडकष्ट करून मुलांना शिकवतात पण शिक्षण घेतलेल्या तरुणांना नोकरीची संधी मिळेलच असे नाही.खेडेगावात एखादा छोटा व्यवसाय सुरू केला तर तोही नीट चालत नाही.अशा बेरोजगार तरुणांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलतो. हे तरुण बिनकामाचे वाटू लागतात.अशा बेरोजगार तरुणांच्या विवाहाचा प्रश्न निर्माण होतो, त्यांचे नातलगही लग्नासाठी मुली देण्यास तयार नसतात.असे हे सुशिक्षित बेरोजगार तरुण काही वेळा चोरी करू लागतात.

यावरून बेरोजगारीचे भीषण वास्तव या कादंबरीत पाहायला मिळते.

शेतकरी पशुपालक समाजातील लोक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असतात.रात्रंदिवस कष्ट करून शेती करत असतात.पशुपालनासारखा जोडधंदा करत असतात पण शेती निसर्गावर अवलंबून असते त्यामुळे काही वेळा दुष्काळ,महापूर,रोगराई यामुळे पीक नीट येत नाही. एखाद्या वर्षी शेतात चांगले पीक आले तर निसर्ग होत्याचे नव्हते करून टाकतो.काही वेळा शेतीला घातलेला खर्चही निघत नाही तेव्हा हे लोक कर्जबाजारी होतात.सावकाराकडून कर्ज घेतले जाते.सावकार पैशासाठी तगादा लावतात,व्याजासाठी लुबाडतात.

यावरून समाजातील सामाजिक आर्थिक विषमताही चित्रीत झालेली दिसून येते.

लेखकांचे वडील आणि त्यांचे चुलते यांच्यातही जमिनीसाठी वाद सुरू असतात.भावभावकीत जमिनीसाठी भांडण तंटे होतात.तेढ निर्माण होते लेखकांच्या वडिलांच्या वाट्याची जमीन चुलते स्वतःच्या मालकीची करून घेतात.लेखकाचे कुटुंब न्याय मागण्यासाठी गेले तरी त्यांना न्याय मिळत नाही. ज्यांच्याकडे पैसा असेल त्यांनाच न्याय मिळतो.

यावरून समाजात वंचित घटकाचे शोषण होताना दिसून येते.

**४. भाषाशैली:**

फेसाटी कादंबरीत चित्रीत झालेला समाज हा शेतकरी, पशुपालक आहे.त्यांची भाषा ही अस्सल ग्रामीण असल्याचे दिसून येते.या भाषेत येळंला, गाडग, लोटकं, श्यात, बगटलं, आईतवार नदर, हुडकली, वरीस, ईकत्याती, म्या, गेलू, ईकून, घेटलं, श्यानं, प्वाॅट असे शब्द दिसून येतात. तसेच कादंबरीतील उपमा, वाक्यप्रचार यांनीही ग्रामीण भाषेचे सौंदर्य वाढवले आहे. उदा. 'गरिबाचं प्वाॅट लई मोठं असतंया', 'पोटात गाडी एवढी आग पडली हुती', 'उकिरड्याचा पांग फिटतूया', 'आंगण नुसतं दरविशावाणी दिसतया', 'आई मरून भैन जगू,' 'पाऊस सुपानं पाणी वतत होता.'

लेखक जत तालुक्यातील असल्याने आणि जत तालुका हा कर्नाटक महाराष्ट्र सीमेवर असल्याने काही ठिकाणी कन्नड भाषेचा प्रभाव दिसून येतो.कादंबरीत

शेलक्या शिव्याही वाचायला मिळतात. 'सुंबरान मांडिलं । सुंबरान मांडिलं ॥ सुंबरान कुणाचं । ऐका माझ्या जल्माचं ॥ अशा लयबद्ध आणि गेयतापूर्ण भाषेतून कादंबरीची सुरुवात झालेली दिसून येते.

**निष्कर्ष :**

फेसाटी कादंबरीत एका सुशिक्षित बेरोजगार पिढीच्या वेदना व्यक्त झाल्या आहेत.बेरोजगारीचे भीषण वास्तव या कादंबरीत चित्रित झाले आहे. तसेच नवशिक्षित तरुणांच्या अयशस्वी प्रेम संबंध,सुशिक्षित तरुणांची घुसमट या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. शेतकरी, पशुपालक समाजाला मिळणारी हीन वागणूक,मूलभूत गरजांसाठी करावा लागणारा संघर्ष येथे चित्रीत केला आहे.तसेच समाजातील लाचखोर नोकरशाही आणि भ्रष्ट न्यायव्यवस्था यांचेही चित्रण दिसते.अज्ञान,दारिद्र्य, कर्जाचे ओझे,नैसर्गिक आपत्ती या सर्वामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात येणाऱ्या समस्या,त्या सोडवण्यासाठी करावी लागणारी धडपड याचे चित्रण या कादंबरीत चित्रीत झाले आहे. या कादंबरीतील व्यथा आणि वेदनाने वाचक अंतर्मुख होतो या कादंबरीतील भाषा शैलीला एक अस्सल ग्रामीण साज आणि बाज असलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ:**

१. पाध्ये,दिगंबर :साहित्य,समाज आणि संस्कृती, लोकवाडमयगृह, मुंबई, दु.आ.२००१.
२. गोरे,नवनाथ : फेसाटी,अक्षर वाङ्:मय प्रकाशन, पुणे, पा.आ.१२ मार्च २०१९